12 OCT 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात 'अमृत वन' बहरणार

## 'सामाजिक वनीकरण'चा उपक्रम; औषधी, दुर्मिळ वनस्पतींच्या एक हजार रोपांची लागवड होणार

▶ **संतोष मिठारी : सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ११ : सामाजिक वनीकरण विभागाकडून शिवाजी विद्यापीठात 'अमृत वन उद्यान' साकारण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागाच्या अडीच हेक्टर परिसरात या उपक्रमाअंतर्गत औषधी, दुर्मिळ आणि इतर काही महत्त्वाच्या वनस्पतींच्या एक हजार रोपांची लागवड केली जाणार आहे. त्याने विद्यापीठाच्या वृक्षसंपदा आणि जैवविविधतेमध्ये भर पडणार आहे.

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त राज्यात विविध ७५ ठिकाणी सामाजिक वनीकरण विभागाच्या माध्यमातून अमृतवन उद्यानांची निर्मिती करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. अमृतमहोत्सवी वर्षाचे प्रेरणादायी स्मरण नागरिकांना रहावे, पुढील वाटचालीत स्वातंत्र्याची स्मृती चिरंतन पिढ्यानपिढ्या जागृत ठेवण्याच्या उद्देशाने अमृतवन साकारण्यात येणार आहे. कोल्हापूर जिल्ह्यात शिवाजी विद्यापीठाची निवड वनीकरण विभागाने केली.

विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागाच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला असलेल्या अडीच हेक्टर परिसरात 'अमृतवन' साकारण्यात येणार आहे. त्याची प्राथमिक स्वरूपातील तयारी वनीकरण विभागाने केली आहे. दोन महिन्यांत रोपांची लागवड पूर्ण करण्याचे नियोजन आहे. दुर्मिळ, वनस्पती, इतर महत्त्वपूर्ण, प्राचीन वनस्पतींच्या संवर्धनाचे केंद्र 'अमृतवन' बनणार आहे.

### या वनस्पतींच्या रोपांची लागवड करणार

- अमृतवनामध्ये मेडसिंगी, गोरख चिंच, अंजन, पिंपळ, हिरडा, बेहडा, चिंच, सिता अशोक, चारोळी, अर्जुन, जंगली बदाम, वायवर्णा, पांढरी सावर, निम, कोकम, रिठा, वड, अर्जुन, नागकेशर, आदी वनस्पतींच्या रोपांची लागवड केली जाणार आहे.



"सामाजिक वनीकरण विभागाकडून साकारण्यात येणाऱ्या अमृतवनामुळे शिवाजी विद्यापीठाच्या वृक्षसंपदा, जैवविविधता आणखी समृद्ध होणार आहे. दुर्मिळ, औषधी वनस्पतींचे संवर्धन देखील होईल.

**- डॉ. विलास शिंदे**, कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ


"या वनामध्ये राज्यातील औषधी, दशमूळ, दुर्मिळ प्रजाती, काही प्रमुख वनस्पतींच्या सुमारे एक हजार रोपांची लागवड केली जाणार आहे. त्याबाबतची पुढील कार्यवाही शासनाच्या सूचनेनुसार करण्यात येईल.

**- प्रियंका दळवी**, वनक्षेत्रपाल, सामाजिक वनीकरण विभाग, करवीर

### हर्बल गार्डन, निसर्ग पायवाट

या वनाच्या संवर्धन, देखभाल सात वर्षे सामाजिक वनीकरण विभाग करणार आहे. त्यानंतर ही जबाबदारी विद्यापीठावर सोपविण्यात येणार आहे. या वनामध्ये मनोरंजक देखावे, वनस्पतींच्या माहितीबाबत क्यूआर कोड, पॅगोडा, पाहणीकरिता उंच मनोरा, निसर्ग पायवाट, रोपवाटिका, हर्बल गार्डन, पक्षांसाठी घरट्यांची निर्मिती, आदी सुविधा शासनाच्या विविध योजनांद्वारे करण्याचा प्रस्ताव आहे.

सकाळ



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात बुधवारी राज्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित चर्चासत्रात डॉ. राजन गवस यांचे बीजभाषण झाले. यावेळी शेजारी श्रीकृष्ण महाजन, हर्षवर्धन देशमुख आदी उपस्थित होते.

# डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या कार्याची प्रेरणा शोधणे आवश्यक : डॉ. गवस

कोल्हापूर, ता. ११ : डॉ. पंजाबराव देशमुख हे गोरगरीब शेतकऱ्यांविषयी तळमळ बाळगणारे कृषी आणि शिक्षण क्षेत्रामध्ये मोठे योगदान देणारे तेजस्वी व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी प्रचंड उंचीचे कार्य केले असून, त्यामागील प्रेरणा काय होती ते शोधणे आवश्यक आहे, असे डॉ. राजन गवस यांनी आज येथे सांगितले.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभाग, गांधी अध्यासन केंद्र, कॉ. दत्ता देशमुख अध्यासन आणि श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावती यांच्यातर्फे आयोजित डॉ. पंजाबराव देशमुख : व्यक्ती, विचार आणि कार्य' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रात त्यांचे बीजभाषण झाले. अध्यक्षस्थानी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, तर श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख प्रमुख उपस्थित होते. दिलीप हंगोले, हेमंत काळमेघ, सुधीर भोंगळे, आदी उपस्थित होते. डॉ. रविंद्र भणगे यांनी प्रास्ताविक केले. राज्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी परिचय करून दिला. नेहा वाडेकर यांनी सूत्रसंचालन केले. सुखदेव उंदरे यांनी आभार मानले.

**जीवनात भरीव कार्य**

देशमुख म्हणाले, भाऊसाहेब ऊर्फ डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जडणघडणीमध्ये छत्रपती शाहू महाराजांचे मोठे योगदान आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांना आदर्श मानून त्यांनी पुढील जीवनामध्ये भरीव कार्य केले. डॉ. महाजन म्हणाले, डॉ. देशमुख यांनी देशाला आधुनिक विचारांची दिशा देण्याचे कार्य केले.'

लोकमत



शिवाजी विद्यापीठाच्या ४३ व्या युवा महोत्सवाचे उद्घाटन करताना विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी रयतच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य प्रभाकर देशमुख, सचिव विकास देशमुख, प्राचार्य डॉ. ज्ञानदेव मस्के, प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे, नगराध्यक्ष सागर पोळ आदी उपस्थित होते.

# कलेचा वापर स्वतःच्या आनंदासाठी आवश्यक

## डॉ. विलास शिंदे; युवा महोत्सवाचे उदघाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**दहिवडी :** 'जीविका आणि उपजीविका या दोन घटकांमधील कला ही मानवी जीवनातील महत्त्वाचा भाग आहे. ६४ कलांपैकी एक तरी कला आपल्यात असायला हवी. कला नसेल तर कलेचे कौतुक करण्याची तरी कला आपल्यामध्ये असावी. कलेचा वापर हा स्वतःच्या आनंदासाठी करावा, दुसऱ्यांना दाखविण्यासाठी नव्हे. तसेच आयुष्याच्या कोणत्याही टप्प्यावर कला शिकायची संधी सोडू नका,' असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी व्यक्त केले.

दहिवडी कॉलेज येथे शिवाजी विद्यापीठाच्या ४३ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि रयतच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य प्रभाकर देशमुख, सचिव विकास देशमुख, सहसचिव प्राचार्य डॉ. ज्ञानदेव मस्के, प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे, नगराध्यक्ष सागर पोळ, माजी प्राचार्य डॉ. सुधीर इंगळे, जयंत परांजपे, डॉ. प्रदीपकुमार शिंदे, हणमंत भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रभाकर देशमुख म्हणाले, 'आपल्या या युवकांच्या देशात युवकच देशाचे भविष्य ठरविणार आहेत. सकारात्मक दृष्टीकोन ठेवून कार्यरत राहिल्यास यश हमखास मिळेल,' असा विश्वासही व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अनिल दडस यांनी केले. प्रा. दत्तात्रय मांजरे आणि प्रा. डॉ. वैशाली बसुगडे यांनी सूत्रसंचालन केले तर प्रा. अवी कोपार्डे यांनी आभार मानले.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठात शनिवारी 'शिवजागर'

कोल्हापूर, ता. ११ : शिवराज्याभिषेकाच्या ३५० व्या वर्षानिमित्त 'शिवजागर' हा 'शिवराज्याभिषेक : भारताच्या इतिहासातील असामान्य घटना' या ग्रंथाच्या औचित्याने शिवाजी विद्यापीठात शनिवारी (ता. १४) विचारमंथन होणार आहे. विद्यापीठातील छत्रपती संभाजी महाराज संशोधन केंद्र, कृष्णा पब्लिकेशन्स आणि मुळशी येथील सह्याद्री प्रतिष्ठानने या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात सकाळी ११ वाजता या कार्यक्रमाला प्रारंभ होईल.

अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के असतील. या विचारमंथनात ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार (विषय : शिवराज्याभिषेकाचे हिंदुस्थानच्या इतिहासातील स्थान), ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर (शिवराज्याभिषेक आणि अधिमान्यतेचा प्रश्न), 'शिवराज्याभिषेक' ग्रंथाचे संपादक डॉ. सदानंद मोरे (शिवराज्याभिषेक : इतिहासाचा प्रवाह बदलणारी घटना) सहभागी होणार आहेत, अशी माहिती इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनिश पाटील यांनी दिली.

पुण्यनगरी

# विद्यापीठात मानसिक आरोग्य दिन उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात मानसशास्त्र अधिविभाग आणि व्यवसाय मार्गदर्शन व मानसशास्त्रीय समुपदेशन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'जागतिक मानसिक आरोग्य दिनाचे' आयोजन करण्यात आले. याप्रसंगी अधिविभागातील विद्यार्थ्यांनी पोस्टर प्रदर्शन केले. याचे उद्‌घाटन वायसीएसआरडीचे प्रभारी संचालक डॉ. नितीन माळी यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी अधिविभागाचे प्र-विभागप्रमुख डॉ. सुभाष कोंबडे उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. अश्विनी पाटील यांनी केले. विद्यार्थ्यांनी अधिविभागासमोर रॅली व पथनाट्याचे सादरीकरण केले. कार्यक्रमासाठी अधिविभागतील डॉ. साक्षी गावडे, डॉ. मिलिंद सावंत, डॉ. विशाल पाटील, समुपदेशक सत्यजित देसाई उपस्थित होते.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात मानसिक आरोग्य दिन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात मानसशास्त्र अधिविभाग आणि व्यवसाय मार्गदर्शन व मानसशास्त्रीय समुपदेशन केंद्र यांच्यातर्फे 'जागतिक मानसिक आरोग्य दिन' उत्साहात झाला. अधिविभागातील विद्यार्थ्यांनी पोस्टर प्रदर्शन भरविले. याचे उद्घाटन वायसीएसआरडीचे प्रभारी संचालक डॉ. नितीन माळी यांच्या हस्ते केले.

अध्यक्षस्थानी अधिविभागाचे प्र-विभागप्रमख डॉ. सुभाष कोंबडे होते. डॉ. अश्विनी पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. साक्षी गावडे, डॉ. मिलिंद सावंत, डॉ. विशाल पाटील, सत्यजित देसाई उपस्थित होते.

12 OCT 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दहिवडीत तरुणाईचा कलाविष्कार

## सळसळता उत्साह; लोककला, पथनाट्य, समूहगीत, लोकवाद्यवृंदाचे सादरीकरण




सातारा जिल्ह्यातील दहिवडी येथील दहिवडी महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाचा ४३ वा युवा महोत्सव सुरु आहे. बुधवारी महोत्सवात एका महाविद्यालयाच्या संघाने कलाविष्कार सादर केला. (छाया : अनिल बिटले, पुसेगाव)

लोकमत न्यूज नेटवर्क

सातारा : देशभक्ती जागविणारी समूहगीते, ठेका धरायला लावणारे लोकसंगीत वाद्यवृंद, सूरमयी सफर घडविणारे सुगम गायन, कला-संस्कृतीचे दर्शन घडविणारी लोककला, लघुनाटिका, मुकनाट्य अशा विविध कलाप्रकारांच्या माध्यमातून मंगळवारी तरुणाईचा कलाविष्कार बहरला. उत्साही आणि जल्लोषी वातावरणात शिवाजी विद्यापीठाच्या ४३ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाला दहिवडी कॉलेजमध्ये प्रारंभ झाला. या महोत्सवात विद्यापीठ कार्यक्षेत्रातील १३१ महाविद्यालयातील २ हजार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे.

दहिवडी (ता. माण) च्या दहिवडी महाविद्यालयाला मध्यवर्ती युवा महोत्सवाच्या यजमानपदाचा मान यंदा मिळाला. महाविद्यालयातील खुल्या रंगमंचावर सकाळी अकरा वाजता महोत्सवाचे उदघाटन झाले. त्यानंतर तासाभरात महोत्सवातील विविध स्पर्धांना सुरुवात झाली. सुगम गायनामध्ये भावगीत, भक्तिगीत, मराठी-हिंदीतील भजन आणि गझलांनी सूरमयी सफर घडविली. एकांकिकामधून आई-मुलीचे नातेसंबंध, लहान मुलांचे भावविश्व उलगडले. महाविद्यालयाच्या मुख्य इमारतीसमोरील पटांगणातील पथनाट्यातून महिला सुरक्षा, महागाई, वाढत्या आत्महत्या, भ्रष्टाचार, आदी सामाजिक प्रश्नांचा तरुणाईने वेध घेतला. दुपारनंतर महोत्सवातील गती वाढली. रंगमंचावरील समूहगीतांतून विद्यार्थ्यांनी देशभक्ती जागविली, तर लोकगीतांनी उपस्थितांना ठेका धरायला लावला. भ्रष्टाचार, महिला सुरक्षा, पर्यावरण संवर्धन या विषयांवर वक्तृत्व स्पर्धेतून तरुणाईने आसूड ओढले.

सोशल मीडियाचा फायदा-तोटा या विषयावर वादविवाद रंगला. पटांगणातील विविध ठिकाणी सांघिक रचनाकृतीतून युवा महोत्सव, स्वच्छता



**शिवाजी विद्यापीठ**

**मध्यवर्ती युवा महोत्सव**

अभियान आणि सेल्फी विषयांवरील विविध कलाकृती साकारल्या. टाकाऊ वस्तूंच्या वापरातून साकारलेल्या या कलाकृती लक्षवेधक ठरल्या. लघुनाट्य आणि मूकनाट्यातून विविध सामाजिक प्रश्न तरुणाईने मांडले.

सायंकाळच्या टप्प्यात महाविद्यालय परिसर तरुणाईच्या गर्दीने फुलला. त्याठिकाणी धनगरी ढोलचा दणदणाट, संबळ, तुणतुणे, लेझीम, तुतारीचा निनाद आणि बासरी, घुमकं, ताशांचा खणखणाट, तर सूरपेटीच्या मधुर सुरांनी लोकवाद्यवृंद स्पर्धा रंगली. विविधांगी लोककलेच्या माध्यमातून कला-संस्कृतीचे दर्शन घडले. वन्समोअरची फर्माईश आणि टाळ्या, शिट्ट्यांची दाद अशा उत्साही वातावरणात लोककला स्पर्धा रंगली.

या महोत्सवात स्पर्धक, समर्थक, प्रेक्षकांच्या भूमिकेतून सहभागी झालेल्या तरुणाईची दिवसभर धमाल सुरू होती. लोककला, पथनाट्य, समूहगीत, लोकवाद्यवृंद, आदी कलाप्रकारांतील सादरीकरणानंतर त्यातील सहभागी कलाकार आणि समर्थक विद्यार्थी आवर्जून 'सेल्फी' घेऊन आनंद व्यक्त करीत होते. दोन दिवस चालणाऱ्या या मध्यवर्ती महोत्सवात ३४ कलाप्रकार सादर होणार आहेत.

### अडीच हजार विद्यार्थ्यांच्या गुणांचा जागर

१ शिवाजी विद्यापीठाच्या ४३ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवात यंदा १३१ महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला. ११०० विद्यार्थिनी, ९०० विद्यार्थी आणि सुमारे ३०० प्राध्यापक यांच्यासह शंभर साथीदार दहिवडी कॉलेज परिसरात दाखल झाले आहेत.

२ या सगळ्यांची व्यवस्था करण्यासाठी दहिवडी महाविद्यालयातील सुमारे अडीचशे कर्मचारी कार्यरत आहेत. सुमारे सहा एकरांत विस्तारलेल्या या महाविद्यालय परिसरात नऊ रंगमंच तयार करण्यात आले आहेत. सांघिक रचना आणि पथनाट्य बाजार पटांगणावर होत आहेत.

मध्यवर्ती युवा महोत्सवाचे यजमानपद मिळणे हे महाविद्यालयाच्या दृष्टीने मानाचे पान आहे. युवा महोत्सवात यजमान म्हणून आम्ही कुठेही कमी पडणार नाही याची काळजी घेतली आहे. इथला अनुभव स्पर्धकांना चांगल्या स्मृती देऊन जाईल याची खात्री आहे.

- डॉ. सुरेश साळुंखे, प्राचार्य